## प्रेसनोट दि. २५.०१.२०२५

लोकसेवक श्री. महेश राचप्पा कोळी, वय-४३ वर्षे, पो.ह/९०५ व लोकसेवक श्री.वैभव रामचंद घायाळ, वय-३२ वर्षे, पो.शि./६२४ दोन्ही नेमणुक मंगळवेढा पोलीस ठाणे, जि.सोलापूर यांनी तक्रारदार यांचेकडे १०,००,०००/- रुपये लाच मागणी व स्विकारलेबाबत सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

मंगळवेढा पोलीस ठाणेस दाखल असले अर्ज चौकशीवरून भविष्यात दाखल होणाऱ्या गुन्हया मधून यातील तक्रारदार यांचे आरोपी म्हणून असलेले नाव कमी करण्यासाठी, तसेच तक्रारदार यांचे इतर नातेवाईक यांना गुन्हयामध्ये अटकपुर्व जामीनसाठी आणि इतर सर्व सहकार्य करण्यासाठी आरोपी लोकसेवक १) श्री. महेश राचप्पा कोळी, वय-४३ वर्षे, पो.ह/९०५ व आरोपी लोकसेवक २) श्री.वैभव रामचंद घायाळ, वय-३२ वर्षे, पो.शि./६२४ दोन्ही नेमणुक मंगळवेढा पोलीस ठाणे, जि.सोलापूर यांनी आजरोजी पंचां समक्ष केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये १०,००,०००/- रूपये लाचेची रक्कम गुन्हयातील रिकव्हरीच्या नावाखाली मागीतली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानुसार आज रोजीच केलेल्या सापळा कारवाईमध्ये आरोपी लोकसेवक क्र.२) श्री.वैभव रामचंद घायाळ, वय-३२ वर्षे, पो.शि./६२४ यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कमेतील पहिला हप्ता म्हणून ५,००,०००/- रूपये स्विकारले असता आरोपी क्र.२ व आरोपी क्र.१ यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने आरोपी लोकसेवक १) श्री. महेश राचप्पा कोळी, वय-४३ वर्षे, पो.ह/९०५ रा.निंबर्गी कंदलगाव रोडला, सिध्दारूढ मठाच्या मागील शेतामध्ये ता.दक्षिण सोलापूर जि.सोलापूर व आरोपी लोकसेवक २) श्री.वैभव रामचंद घायाळ, वय-३२ वर्षे, पो.शि./६२४, रा. गोपाळपूर शिवाजीनगर, सुर्यवंशी किराणा दुकानाजवळ ता.पंढरपूर जि.सोलापूर, दोन्ही नेमणुक मंगळवेढा पोलीस ठाणे, जि.सोलापूर यांचेविरुध्द मंगळवेढा पोलीस स्टेशन जि.सोलापूर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्रीमती शितल जानवे-खराडे, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री. उमेश पाटील, पोलीस निरीक्षक श्री. किशोरकुमार खाडे, पोलीस अंमलदार ऋषीकेश बडणीकर, प्रितम चौगुले, अजित पाटील यांनी केली आहे.

**नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर व मोबाईल नंबर ९५५२५३९८८९ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.**

१) **मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net**
२) **फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB**
३) **वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in**

(उमेश दा. पाटील)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.